श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-६, अंक-१ब | जानेवारी-२०१८ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | विशेषांक, पाने ६ |

## वालावलकर रुग्णालय, श्रीक्षेत्र डेरवण येथे 'बजाज फिनसर्व्ह कॅथलॅब सेंटर'चा शुभारंभ

*"...या ठिकाणी चाललेले कार्य हे ईश्वरी कार्य असून सेवा आणि आशीर्वाद, अध्यात्म आणि विज्ञान या सर्वांची सांगड घालून चाललेले आहे..."*

*- मा. ना. दीपक केसरकर*

मा. ना. श्री. दीपक केसरकर, गृह (ग्रामीण विभाग), वित्त आणि नियोजन राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते दि. १३ जानेवारी २०१८ रोजी भ.क.ल.वालावलकर रुग्णालय, श्रीक्षेत्र डेरवण येथे सुसज्ज अशा कॅथलॅब सेंटरचे उद्घाटन झाले. या कॅथलॅब सेंटरच्या उभारणीची संपूर्ण आर्थिक जबाबदारी 'बजाज फिनसर्व्ह' या आर्थिक क्षेत्रातील अग्रगण्य संस्थेने उचलून कोकणातील लोकांना हृदयविकारासंबंधी अद्ययावत उपचार उपलब्ध करून देण्यात मोठा हातभार लावला आहे.

या कॅथलॅब सेंटरमुळे आता 'अँजिओग्राफी' आणि 'अँजिओप्लॅस्टी' या सेवा रुग्णालयातच उपलब्ध झाल्यामुळे हृदयविकाराच्या रुग्णांना अतिशय माफक दरात हे उपचार मिळू शकतील. जागतिक दर्जाचे 'फिलिप्स एफडी-१०' हे कॅथलॅब मशिन, अत्याधुनिक कॉरोनरी केअर युनिट आणि हृदयविकारासंबंधी सर्वंकष उपचाराची सोय, यामुळे हृदयविकारग्रस्त रुग्णांना ही कॅथलॅब एक वरदानच ठरणार आहे. 'बजाज फिनसर्व्ह'चे वरिष्ठ अधिकारी मा. श्री. सी.पी. त्रिपाठी




*उद्घाटन समारंभात मा. श्री. दीपक केसरकर, श्री. सी.पी.त्रिपाठी, श्री. अजय साठे, श्री. विकासराव वालावलकर, श्रीकाका महाराज, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. नेताजी पाटील, श्री. बाळासाहेब काजरेकर*



*व्यासपीठावर डावीकडून-श्री.विकास वालावलकर साहेब, दीप प्रज्वलन करताना मा.ना.दीपक केसरकर, बजाज फिनसर्व्हचे सी.एस.आर. श्री.सी.पी.त्रिपाठी*

व मा. श्री. अजय साठे यांच्या अथक प्रयत्नानेच डेरवण येथे हे 'कॉम्प्रिहेन्सिव्ह कार्डियाक केअर युनिट' सुरू झाले आहे. या कार्यक्रमास 'बजाज फिनसर्व्ह'चे वरिष्ठ अधिकारी मा. श्री. सी.पी.त्रिपाठी व श्री. अजय साठे हे आवर्जून उपस्थित होते.

''बजाज समूहाची मदत योग्य त्या कार्यासाठी योग्य त्या संस्थेकडे सुपूर्द झाली आहे याचे आपल्याला समाधान आहे. कोंकणातील डेरवण ट्रस्टच्या माध्यमातून सुरू असलेल्या सर्व प्रकल्पांमुळे आपण भारावून गेलो आहे. अतिशय दुर्गम भागात सुरू असलेले आरोग्यसेवेचे काम व त्याचसमवेत सुरू असलेली अन्य समाजोपयोगी कामे पाहून असे वाटते की समाजाच्या आमूलाग्र बदलाचा ध्यास घेतलेली माणसेच असे कार्य करू शकतात. अफाट कार्यक्षमता असलेली माणसे या समूहात आहेत आणि त्यांना प.पू. श्रीकाका महाराजांचे अचूक मार्गदर्शन आहे. यामुळेच हे सर्व साध्य झाले आहे. या ट्रस्टच्या माध्यमातून सुरू असलेली वैद्यकीय सेवा कोंकणातील खेड्यापाड्यात गोरगरीब रुग्णांपर्यंत पोहोचलेली आहे ही अतिशय अभिमानास्पद गोष्ट आहे.'' असे मनोगत मा. श्री. सी.पी. त्रिपाठी यांनी उद्घाटन समारंभात व्यक्त करून श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या कार्याला व पुढील वाटचालीला शुभेच्छा दिल्या.



*श्री. सी.पी.त्रिपाठीसाहेब श्रीमहाराजांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहताना*

मा. मंत्रीमहोदय आपले विचार व्यक्त करताना आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, 'गोरगरीब रुग्णांना येथे अतिशय अल्प दरात अत्युच्च दर्जाची वैद्यकीय सेवा दिली जाते. मात्र एवढ्यापुरतेच हे काम मर्यादित नाही तर संपूर्ण कोंकणातच व्यापक स्वरूपात आरोग्य सेवा देण्यासाठी वालावलकर रुग्णालय कटिबद्ध आहे. आरोग्यसेवेसमवेतच उच्च दर्जाचे नर्सिंग स्कूल, वैद्यकीय महाविद्यालय, विविध पॅरामेडिकल कोर्सच्या माध्यमातून कोंकणातील तरुण विद्यार्थी-विद्यार्थिनींना उपलब्ध झालेले शिक्षणाचे विविध स्रोत येथे आहेत. येथे खेळाला आणि खेळाडूंना उत्तेजन दिले जात आहे. हे सर्व



*श्री. अजय साठेसाहेब श्रीमहाराजांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहताना*

कार्य अलौकिकच आहे. कोकणच्या विकासात डेरवण येथील सर्व प्रकारचे प्रकल्प हे 'मैलाचा दगड'च आहेत असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. सद्गुरू श्रीदिगंबरदास महाराज व भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर यांचे धोरण व या उभयता गुरुशिष्यांनी पाहिलेल्या महान स्वप्नांची पूर्तता करण्याचे काम प.पू. श्रीकाका महाराज व श्री. विकासराव वालावलकर हे गुरुशिष्यही तेवढ्याच तन्मयतेने आणि निष्ठेने करीत आहेत याबद्दल आपण नतमस्तकच आहोत.' मा. श्री. दीपक केसरकर आपल्या भाषणाचा समारोप करताना म्हणाले की या ठिकाणी चाललेले कार्य हे ईश्वरी कार्य असून सेवा आणि आशीर्वाद,




*संस्थेच्या विविध उपक्रमांविषयी माहिती देताना श्री. विकास वालावलकरसाहेब; बसलेले डॉ. सुवर्णा पाटील, श्री. दीपक केसरकर, श्री. सी.पी.त्रिपाठी*




*बजाज फिनसर्व्हचे सी.एस.आर. श्री.सी.पी.त्रिपाठी बोलताना; बसलेले (डावीकडून) डॉ. सुवर्णा पाटील, श्री. दीपक केसरकर, व श्री. विकासराव वालावलकरसाहेब*



*क्रीडासंकुल प्रांगणात वार्तालाप करताना श्रीकाका महाराज, मा. ना. श्री. दीपक केसरकर, आणि श्री. विकासराव वालावलकर*

अध्यात्म आणि विज्ञान या सर्वांची सांगड घालून चाललेले आहे. ट्रस्टच्या कार्यास व पुढील वाटचालीस त्यांनी मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या.

हा डेरवणचा परिसर व येथे सुरू असलेले रुग्णालय, शाळा व क्रीडासंकुल आज कोंकणचा केंद्रबिंदूच ठरत असल्याचा निर्वाळा, ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त मा. श्री. विकासराव वालावलकर यांनी ट्रस्टच्या गत अठ्ठेचाळीस वर्षांच्या सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक कार्याचा आढावा घेताना दिला. रुग्णालयाच्या वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनी रुग्णालयात उपलब्ध असलेल्या विविध आरोग्यविषयक सोयी-सुविधांची, योजनांची माहिती सांगून अधिकाधिक लोक आता रुग्णालयात माफक दरात मिळणाऱ्या आरोग्यसेवांकडे अधिक विश्वासाने वळू लागले आहेत असे आपल्या प्रास्ताविक भाषणात सांगितले. या वेळी मा. ना. केसरकर यांनी इंग्रजी माध्यमाची शाळा, क्रीडासंकुल, हॉस्पिटल आणि मेडिकल कॉलेज यांना भेट देऊन अत्यंत आस्थापूर्वक पहाणी केली.





*मा. ना. श्री. दीपक केसरकर, गृह राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य बोलताना*



*इंग्लिश मिडियम विद्यार्थ्यांनी केलेल्या विविध वस्तूंची पाहाणी करताना मा. श्री. दीपक केसरकर, सौ. शरयू यशवंतराव, श्री. विकासराव वालावलकर, श्रीकाका महाराज*



*हॉस्पिटलच्या आय.पी.डी. विभागात डावीकडून श्री. अजय साठे, डॉ. सुवर्णा पाटील, मा. श्री. दीपक केसरकर, श्री. विकासराव वालावलकर, (पाठीमागे) श्रीकाका महाराज व श्री. सी.पी.त्रिपाठी*




*मा. ना. श्री. दीपक केसरकर यांचा अभिप्राय*

**दीपक केसरकर**

अर्थ व गृह राज्यमंत्री, महाराष्ट्र

१३-१-२०१८

वालावलकर हॉस्पिटल, मेडिकल कॉलेज, क्रीडासंकुल व इंग्रजी माध्यम विद्यालय हे संकुल केवळ विद्यादानाचे संकुल नाही तर सामाजिक परिवर्तनाचे व्यासपीठ आहे. ग्रामविकासाच्या संकल्पनेतून कमलाकरपंत वालावलकर यांनी श्रीसहजानंदसरस्वती महाराजांच्या आध्यात्मिक मार्गदर्शनाखाली सुरू केलेला हा लोकसेवेचा महायज्ञ आज कोकणातील एका छोट्याश्या गावातून आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचला. कॅन्सरपासून सर्व रोगांपासून ते शेतकऱ्यांना नेहमी सामोरे जावे लागत असलेल्या सर्पदंश, लेप्टोस्पायरोसीसपर्यंत व कुपोषित बालकांपासून मातांच्या कल्याणापर्यंत सर्व बाबींवर केलेले संशोधन व त्यावर केलेली अंमलबजावणी मन अचंबित करणारी आहे. सेवाभावी वृत्तीतून काय चमत्कार घडू शकतो याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे. भारतातील नागरिकांना अभिमानास्पद असलेल्या कामगिरीला आज आंतरराष्ट्रीय मान्यता मिळत आहे ह्याचा अभिमान व कौतुक सर्व कोकणवासीयांना आहे. वालावलकर ट्रस्टचे काम समर्थपणे पेलणारे विकासराव वालावलकर व त्यांचे प्रेरणास्थान काकामहाराज व त्यांच्या पूर्ण संघापुढे नतमस्तक होऊन त्याना हार्दिक शुभेछा देतो. आपल्याकडून खूप काही शिकलो. धन्यवाद!

**- दीपक केसरकर**

# महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री माननीय श्री. विनोद तावडे यांची डेरवण 'विद्यानगरी'ला भेट!

महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री माननीय श्री. विनोद तावडे यांनी श्रीक्षेत्र डेरवण येथील श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या शैक्षणिक संकुल, क्रीडासंकुल व वैद्यकीय महाविद्यालयाला दि. ११ जानेवारी २०१८ रोजी भेट दिली. ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त मा. श्री. विकासराव वालावलकरसाहेब यांनी त्यांना ट्रस्टच्या विशाल परिसरात फिरवून विविध उपक्रमांची माहिती दिली. ट्रस्टच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मंत्रीमहोदय आले असता, व्यायाम शाळेत मल्लखांबावर कसरत करणाऱ्या मुलांशी आणि शाळेच्या बंदिस्त क्रीडांगणात जिमनॅस्टिकचा सराव करणाऱ्या मुलींकडे जाऊन त्यांनी त्यांच्याशी बातचीत केली. शाळेच्या विविध उपक्रमांची माहिती त्यांनी शाळेच्या शिक्षण संचालिका सौ. शरयू यशवंतराव यांच्याशी चर्चा करून घेतली आणि समाधान व्यक्त केले. क्रीडासंकुलाला दिलेल्या भेटीच्या वेळी राष्ट्रीय पातळीवर खेळणाऱ्या कु. ईशा पवार आणि मृणाल सकपाळ या डेरवण क्रीडासंकुलाच्या दोन होतकरू, उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहनपर आशीर्वाद दिले. संस्थेच्या वैद्यकीय महाविद्यालयालाही मंत्रीमहोदयांनी भेट दिली. मेडिकल डायरेक्टर डॉ. सुवर्णा पाटील यांनी संस्थेच्या कामाविषयी सर्वांगीण माहिती देणारे एक सादरीकरण मंत्रीमहोदयांपुढे केले. आपले समाधान अभिप्राय पुस्तकात नोंदवून मा. ना. तावडे मार्गस्थ झाले.



*वैद्यकीय महाविद्यालय प्रकल्पाची माहिती घेताना (डावीकडून) श्री. विकासराव वालावलकर, मा. ना. श्री. विनोद तावडे, डॉ. विनय नातू आणि मेडिकल डायरेक्टर डॉ. सुवर्णा पाटील*




*वैद्यकीय महाविद्यालयात डॉ.सुवर्णा पाटील, मा.ना. श्री. विनोद तावडे, श्रीकाका महाराज आणि श्री. विकासराव वालावलकर*



*इंग्लिश मिडियम स्कूलच्या मल्लखांबपटू विद्यार्थ्यांशी संवाद करताना मा. ना.श्री. विनोद तावडे, सोबत प्रशिक्षक श्री. रणवीर सावंत*



*क्रीडासंकुलात (डावीकडून) प्रशिक्षक कु. प्रियंका खिंडरे, मा. ना. श्री. विनोद तावडे, श्री. विकासराव वालावलकर, व संकुलाची राष्ट्रीय खेळाडू ईशा पवार*





मा. ना. श्री. विनोद तावडे यांचा अभिप्राय

कोकणासारख्या interior मध्ये इतके अद्ययावत वैद्यकीय महाविद्यालय, वैद्यकीय सेवा, क्रीडा सुविधा निर्माण करणे हे फक्त समाजाशी असणारी बांधिलकी – मानवतेशी असणारे नाते – हे सगळे स्वामी समर्थांच्या आशीर्वादानेच होऊ शकते. सर्व संस्थाचालक-कर्मचारी ह्यांचे मनापासून अभिनंदन!

– **विनोद तावडे**

# नागालँडच्या कल्याण आश्रमाचे 'ऑर्गनायझिंग सेक्रेटरी' मा. श्री. गोपाळकृष्ण यांची भेट

नागालँड येथील कल्याण आश्रमाचे 'ऑर्गनायझिंग सेक्रेटरी' मा. श्री. गोपाळकृष्ण यांनी दि. २८.१२.२०१७ रोजी संस्थेच्या रुग्णालयाला आणि वैद्यकीय महाविद्यालयाला भेट देऊन तेथील कामाची पहाणी केली. भारताच्या दुर्गम अशा पूर्वेकडील सीमावर्ती भागात निरलसपणे सेवाकार्य चालविणाऱ्या सेवाव्रती अशा श्री. गोपालकृष्ण यांनी आपला संतोष व्यक्त करणारा अतिशय बोलका असा अभिप्राय नोंदविला आहे. त्याचा मराठीत भावार्थ असा– ''या मेडिकल कॉलेजचे सेवाभावी वृत्तीने चाललेले कार्य पाहून मला मोठी प्रेरणा मिळाली आहे. येथील कार्याने मला नागालँड येथील लोकांत आम्ही करीत असलेल्या कामासाठी मोठी ताकद दिली आहे. या संस्थेच्या पुढील कार्यास यश मिळो अशी मी प्रार्थना करून शुभेच्छा देतो.''




मा. श्री. गोपालकृष्ण यांचा अभिप्राय

Gopalkrishna, Organising Secretary
Kalyan Ashram, Nagaland, 94360 31295

I am much inspired by the service of this medical college. It give strength to me to continue to work for the Janjati Communities of Nagaland. I wish and pray for this Organisation.

*sd/- Gopalkrishna*
*28/12/2017*